**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अकोला यांचेकडून प्राप्त झालेल्या अकोला जिल्हयातील ३० रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. १८.११.२०२१ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी खनिकर्म विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडून अकोला जिल्हयातील ३० रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १८.११.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-101 of 2021 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-211103-FTS-0105 दि. ०३.११.२०२१ अंन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

1. मा. श्रीमती निमा अरोरा, जिल्हादंडाधिकारी, अकोला – अध्यक्ष
2. श्री. संजय दे. पाटील, प्र. प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती – सदस्य
3. श्री मनिष होळकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अकोला – आयोजक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. १४.१०.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १८.११.२०२१ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी मा. श्रीमती निमा अरोरा यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे सदस्य श्री. सं. दे. पाटील, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अकोला जिल्हयातील ३० रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अकोला यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

1. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, २रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
2. प्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
3. उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा चौक, नेहरू पार्क जवळ, अकोला.
4. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, जिल्हा परिषद, अकोला, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.
5. जिल्हयातील सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये सर्व पंचायत समिती कार्यालये व संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, जि. अकोला.

श्री. सं. दे. पाटील, प्रभारी प्रादेशिक अधिकारी अमरावती तसेच सदस्य जाहिर पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी श्री प्रशिल शुक्ला, एन्व्हायरो टेक्नो कंसल्टंट प्रा.लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री. सं. दे. पाटील, प्रभारी प्रादेशिक अधिकारी अमरावती तसेच सदस्य जाहिर पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितीतांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितीतांना केली.

श्री अमीत काळकर, अकोला, यांनी सुचना केली की, रेतीघाटांमधून रेती वाहतुक करण्याकरीता मोठया वाहनांना परवानगी देण्यात यावी. याबाबत प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी श्री प्रशिल शुक्ला, एन्व्हायरो टेक्नो कंसल्टंट प्रा.लि., नागपूर यांनी माहिती दिली की, रेती उत्खनन करणे व ट्रॅक्टर ट्रॉलीमधे भरणे ही क्रिया कामगारांमार्फत टोपले व फावडयांचा उपयोग करून क्रिया करणे बंधनकारक आहे. रेतीघाटांमधून डेपोपर्यंत रेती वाहतुक करण्याकरीता उपयोगात येणा-या रस्त्याची क्षमता ज़ड वाहतुक करण्याकरीता आवश्यक असलेल्या क्षमते एवढी नाही. तसेच मोठया अवजड वाहनातुन रेती वाहतुक करणा-या वाहनांमुळे रस्ते खराब होत असल्यामुळे मोठया वाहनांना रेती वहन करण्याकरीता परवानगी नाही.

मा. अध्यक्षा यांनी निदर्शनाणास आणून दिले की, श्री प्रशिल शुक्ला, एन्व्हायरो टेक्नो कंसल्टंट प्रा.लि., नागपूर यांनी उत्तर दिलेले असून त्यानुसार रेतीची वाहतुक ट्रॅक्टरट्रॉली चा उपयोग करून करावयाची आहे. त्यांनी पूढे सांगीतले की, निवीदा प्रसिदध झाल्यानंतर त्यातील अटी व शर्तींचे वाचन करण्यात येवून त्या व्यवस्थित समजुन घ्याव्या. तसेच रेतीघाटांवर सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात यावेत व रेतीघाटांचे लिलाव करण्यात येणार असून एकुण ३० रेतीघाटांपैकी पर्यावरणीय अनुमती मंजुर झालेल्या रेतीघाटांमधूनच रेती उत्खनन करण्यास रेतीघाट उपलब्ध होतील.

श्री अमीत काळकर यांनी सुचना केली की, रेती घाटांमधून रेती वाहून नेण्याकरीता देण्यात आलेली वेळ वाढविण्यात यावी. कारण रेतीघाटामधून वाहतुक करतांना देण्यात येणा-या पासेस वर २५ कि.मी. प्रती तास याप्रमाणे वेग नोंदविण्यात येतो परंतु वाहन नादुरूस्त अथवा पंक्चर झाल्यास त्याच्या दुरूस्ती करीता किमान अर्धा तास पेक्षा जास्त वेळ लागतो. याबाबत मा. अध्यक्षा यांनी

सांगीतले की, वाहतुकी करीता अर्धा तास वेळ वाढवून देण्यात यावा असा प्रस्ताव याअगोदरच वरीष्ठांना सादर करण्यात आलेला आहे. त्याला मंजुरी मिळेल असे अपेक्षीत आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगीतले की, रेती घाटांचे लिलाव झाल्यानंतर एकुण ३० रेतीघाटांपैकी पर्यावरणीय अनुमती मंजुर झालेल्या रेतीघाटांमधूनच रेती उत्खनन करण्यास रेतीघाट उपलब्ध होतील.

श्री अमीत काळकर यांनी विचारणा केली की, रेतीघाटांकरीता जमा करण्यात आलेली अनामत रक्कम कोणत्या खात्यामधे जमा केली जाईल व ती परत कधी मिळेल. यावर मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, सदर अनामत रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयाचे खात्यावर जमा करण्यात येईल व संबंधीत रेतीघाटास पर्यावरणीय अनुमती न मिळाल्यास अनामत रक्कम परत करण्यात येईल.

श्री अमीत काळकर यांनी सांगीतले केली की, वाहतुक पासेस तपासल्या जात नाहीत. याबाबत मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, याबाबत पथक गठीत करण्यात येईल.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| होळकर | (सं. दे. पाटील) | |
| (मनिप होळकर) | (सं. दे. पाटील) | (निमा अरोरा) |
| आयोजक | सदस्य | अध्यक्ष लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी | प्रभारी प्रादेशिक अधिकारी | जिल्हादंडाधिकारी, अकोला |
| अकोला | अमरावती | |